# अमरावती महानगरपालिका, अमरावती

कार्यालय-महानगरपालिका, अमरावती
पत्र क्र. अमनपा/जसंवि/ ७२ /२२
दिनांकः - ६ /०७/२०२२

## कोटेशन नोटीस

आपल्या देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभुमीवर १५ ऑगस्ट, २०२२ पर्यंत ५२ आठवड्यांच्या कालावधीत अमरावती महानगरपालिका अंतर्गत "आझादी का अमृत महोत्सव" चे कार्यक्रम व महानगरपालिका अंतर्गत राबविण्याबाबत येत असलेल्या विविध योजना, विकास कामे व उपक्रमांवर आधारीत जनजागृतीपर प्रचार व प्रसिध्दी करावयाचे आहे. तरी इच्छुकांनी आपले दरपत्रक जनसंपर्क अधिकारी यांचे कार्यालय जनसंपर्क विभाग येथे दिनांक १२ जुलै,२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत आणून द्यावेत. त्यानंतर आलेले कोटेशन स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | दर |
|---|---|---|
| १ | प्रशासनाच्या विविध विभागातर्फे राबविलेल्या योजनांवर आधारीत माहिती पटाची निर्मिती | |
| २ | प्रशासनाच्या विविध विभागामार्फत राबविलेल्या योजनांवर व लाभार्थ्यांवर आधारीत यशोगाथांची निर्मिती | |
| ३ | आकर्षक स्वरुपात जनजागृतीपर लघुपटाची निर्मिती | |
| ४ | ६० ते १२० सेकन्द अवधीच्या आकर्षक प्रिसाईस कॅप्सूल व्हिडीओची निर्मिती | |
| ५ | टि.व्ही. जाहिरात निर्मिती | |
| ६ | आकर्षक स्वरुपात जनजागृतीपर चित्ररथ निर्मिती | |
| ७ | ऑडिओ-व्हिडीओ जिंगल्स | |
| ८ | जनजागृती पथनाट्य सादर करणे | |

अटी व शर्ती :-

१. मागविण्यात येत असलेले दर हे कामांचे / योजनांचे दर निश्चित करण्याकरीता मागविण्यात येत आहे. त्यामुळे सदर केलेले दरपत्रक / प्रस्तावाचे आधारे काम देण्यात येणार नाही.
२. वरील प्रत्येक कामाकरीता त्या संबंधीत संस्था / एजन्सी यांनीच प्रती व्यक्ती / प्रती दिन व प्रती महिना अथवा संबंधीत बाबींनुसार तसेच आवश्यक असल्यास सविस्तर प्रस्ताव दर / प्रस्ताव द्यावे.
३. दर सर्व खर्च व करांसह द्यावे व प्रत्येक कामांचे स्वतंत्र दरपत्रक द्यावे.
४. प्राप्त दरपत्रकांचे आधारे न्युनतम दराआधारे व नियमानुसार मनपाकडुन योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. परंतु प्राप्त दरपत्रक / प्रस्ताव स्विकारणे अथवा नाकारणे तसेच योजना राबविणे बाबतचे सर्वाधिकार मा.आयुक्त यांचेकडे राखीव आहेत.

जनसंपर्क अधिकारी
महानगरपालिका, अमरावती

उपायुक्त (सा.)
महानगरपालिका, अमरावती

प्रतिलिपी,